## <u>बेस्टच्या नेटवर्क वर छतावरील सौर पी व्ही यंत्रणेच्या जोडणीसाठी अर्जाची प्रक्रीया</u>

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक मंडळाने (छपरावरील सौर फोटो व्होल्टेक यंत्रणेसाठी नक्त मापन) विनियम 2015 हे 10 सप्टेंबर 2015 रोजी अधिसुचित केले आहे. त्यानुसार 1 मेगावॅट पेक्षा कमी भार असणा-या वैयक्तिक वीज ग्राहकांसाठी छतावरील सौर यंत्रणा स्थापित करुन वीजेचा वापर कमी करण्याची मान्यता देण्यात आली आहे. जे आमच्या वेबसाइटवर टाकण्यात आले आहे. त्याची प्रक्रीया खालील प्रमाणे आहे.

(अ) ज्या वीजग्राहकांना छपरावरील सौर नक्त मीटर मोजमाप यंत्रणा स्थापित करावयाची आहे किंवा ज्यांनी आधीच ही यंत्रणा स्थापित केली आहे त्यांनी बेस्टच्या वेबसाइट वरील अर्ज भरुन प्रणालीच्या तांत्रिक बाबी पूर्ण करुन बेस्टच्या संबधीत कक्ष कार्यालयात नोंदणी शुल्कासह सादर करावा किंवा ऑनलाइन अर्ज करुन शुल्क भरावे.

(ब) बेस्ट अशा ग्राहकांचे अर्ज नोंदणी करुन कामकाजी तीन दिवसात पावती देइल, तसेच अर्जातील त्रुटी तीन दिवसात कळविण्यात येतील.

(क) बेस्ट खालील बाबींचा विचार करुन नोंदणीकृत अर्जासाठी नोंदणी पासून 15 कामकाजी दिवसात तांत्रिक व्यवहार्यता अभ्यास आयोजित करेल.

1. जोडणीच्या मागणी प्रमाणे एसी भार पातळी

2. अर्जदाराचा मंजूर भार/करार मागणी संबधित छपरावरील सौर फोटो व्होल्टेक यंत्रणेसाठी मुल्यांकन केलेला एसी भार.

3. संबधित छपरावरील सौर फोटो व्होल्टेक यंत्रणेसाठी मुल्यांकन केलेला एसी भार.

4. संबधित वितरण ट्रान्सफॉर्मरची उपलब्ध संचयी क्षमता (जोडलेली यादी पहा)

(ड) एखादया विशिष्ट वितरण ट्रान्सफॉर्मरवर छपरावरील सौर फोटो व्होल्टेक यंत्रणा स्थापित करण्यासाठी कोणताही अर्ज नाकारण्याआधी बेस्ट 15 दिवसाच्या आत किंवा आवश्यकतेनुसार दिर्घ कालावधीची मुदत अर्जदाराला देईल.

(इ) तांत्रिकदृष्टया व्यवहार्य असल्याचे आढळल्यास व्यवहार्यता अभ्यास पूर्ण व्हायच्या 7 दिवसात बेस्ट छपरवरील सौर फोटो व्होल्टेक यंत्रणा स्थापित करण्यासाठी मंजूरी देईल. मंजूरीमध्ये यंत्रणेच्या कमाल परवानगी योग्य क्षमता सूचित करण्यात येईल आणि मंजूरीच्या तारखेपासून 6 महिन्याच्या कालावधीसाठी किंवा बेस्ट द्वारे मान्य केल्या जाणा-या विस्तारीत कालवधीसाठी सूचित केले जाईल.

(फ) अर्जदाराने मंजूरी वैधता कालावधीत कार्य पूर्णता अहवाल सादर केला पाहीजे सोबत तांत्रिक विशिष्टता, निर्मात्याकडून प्राप्त झालेला चाचणी अहवाल / यंत्रणा प्रदाता वगैरे सह बेस्टला छपरावरील सौर फोटो व्होल्टेक यंत्रणेच्या चाचणीसाठी आणि आर्यान्वित करण्यासाठी विनंती करावी.

(ज) अर्जदाराच्या विनंती नंतर बेस्ट दहा कामकाजी दिवसांच्या आत चाचणी करुन यंत्रणा कार्यान्वित करेल आणि नक्त मीटर मोजमाप उपकरणे आणि छपरावरील सौर फोटो व्होल्टेक यंत्रणा पुढील 10 कामकाजी दिवसात स्थापित करेल.

(ह) छपरावरील सौर फोटो व्होल्टेक यंत्रणा स्थापित केल्यानंतर बेल्ट जालव्युहाशी जोडणी करण्याअगोदर पात्र वीजग्राहक आणि बेस्ट यांच्यात नक्त मिटर मोजमाप निर्धारीत स्वरुपातील करार करणे आवश्यक आहे.